# लोकविज्ञान दिनदर्शिका २०२२

लोकविज्ञान प्रकाशन



## सुझन सॉलोमन

अमेरिकन पर्यावरण-रसायन वैज्ञानिक.

जन्म - १९ जानेवारी, १९५६; शिकागो, अमेरिका



अंटार्क्टिकावरील 'ओझोन-छिद्रे' यामागील वैज्ञानिक कारणे शोधणा-या सुझन सॉलोमन (Susan Solomon) ह्यांना पर्यावरण- विज्ञानातील आघाडीच्या वैज्ञानिक मानले जाते. पृथ्वीभोवतालच्या ओझोन थराचे हानीकारक रसायनांपासून संरक्षण करण्यासाठी `मॉन्ट्रियल प्रोटोकॉल' आला. तो येण्यासाठी वैज्ञानिक आणि धोरणकर्ते यांच्यातील संवादकाचे महत्त्वपूर्ण कामही त्यांनी केले. सॉलोमन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी `ग्लोबल वॉर्मिंग'चा मानवनिर्मित कार्बन डाय ऑक्साईडच्या उत्सर्जनाशी असलेला अन्योन्य संबंध दाखवून दिला.

## जानेवारी - २०२२

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | १ |
| २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ |
| ३० | ३१ | | | | | |



### या महिन्यातील विज्ञान दिन

६ जानेवारी- ग्रेगॉर योहान मेंडेल : ऑस्ट्रियन जीवशास्त्रज्ञ
जन्म : २२ जुलै १८२२, मृत्यू : ६ जाने, १८८४,
अनुवंशिकता शास्त्राचा पाया घातला.

८ जानेवारी - गॅलिलिओ गॅलिली : इटालियन खगोलशास्त्रज्ञ
जन्म : १५ फेब्रु. १५६४, मृत्यू : ८ जाने, १६४२.
कोपर्निकसच्या सूर्यकेंद्री विश्वाच्या सिद्धांताला पुष्टी दिली.
गतिशास्त्राची एक विज्ञानशाखा म्हणून उभारणी.

१० जानेवारी - कॅरोलस लिन्नेयुस : स्वीडिश जीवशास्त्रज्ञ
जन्म : २३ मे १७०७, मृत्यू : मृत्यू: १० जाने, १७७८
वनस्पती व प्राणी यांचे शास्त्रीय पायावर प्रथमच वर्गीकरण (१७३५)

१४ जानेवारी - एडमंड हॅले : इंग्लिश खगोलशास्त्रज्ञ
जन्म : ८ नोव्हें. १६५६, मृत्यू : २५ जाने, १७४२.
धूमकेतू (हॅलेचा) दर ७५-७६ वर्षांनी दिसेल हे १७०५ साली अचूकपणे वर्तवले.



### तारांगण

जानेवारी ३, ४ : **Quadrantids** उल्का वर्षाव -हा सरासरीपेक्षा मोठा उल्का वर्षाव आहे. ताशी ४० पर्यंत उल्का पडू शकतात. काळाच्या ओघात लय पावलेला धूमकेतू २००३ EH १ च्या धूलिकणांमुळे हा उल्का वर्षाव होतो. बहुसंख्य उल्का भूतप तारकासंघातून आल्यासारख्या वाटतील.

जानेवारी ०७ : बुधाचे परम पूर्वेकडील इनांतर - बुध सूर्यापासून १९.२ डिग्री अंतरावर. बुधाचे निरीक्षण करण्यासाठी ही वेळ योग्य आहे कारण तो संध्याकाळी पश्चिम क्षितीजाच्या वरती दिसून येईल.


With best complements from
M J WOODS
MANUFACTURERS OF
SHEET METAL
PRESSED PARTS
& ASSEMBLIES
Plot No. 2, S.No. 331/332/333,
Ambad veth,
Taluka - Mulshi,
Dist. - Pune 411 042. (India)
E-mail : mjwoods@vsnl.com

# लोकविज्ञान दिनदर्शिका २०२२

लोकविज्ञान प्रकाशन



## स्वान्त अऱ्हीयनियस

### स्वीडिश भौतिकशास्त्र वैज्ञानिक

जन्म: १९ फेब्रुवारी १८५९; मृत्यू २ ऑक्टोबर १९२७

'आयनीय विघटनाच्या' संशोधनासाठी १९०३ सालचे रसायनशास्त्राचे नोबेल परितोषिक मिळवलेले स्वान्त अऱ्हीयनियस (Svante Arrhenius) हे विज्ञानाच्या विविध शाखांत चौफेर भरारी मारणारेही होते. जीवाश्म इंधन आणि इतर मानवनिर्मित ज्वलन प्रक्रियांमधून होणारे कर्बवायूचे उत्सर्जन पृथ्वीच्या तापमानवाढीस कारणीभूत ठरू शकते हा अऱ्हीयनियस ह्यांचा १९व्या शतकाच्या अखेरचा निष्कर्षच आजच्या आधुनिक हवामानविज्ञानाच्या केन्द्रस्थानी आहे.



## फेब्रुवारी - २०२२

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | ५ |
| ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ |
| २७ | २८ | | | | | |
| | | | | | | |



### या महिन्यातील विज्ञान दिन

**२ फेब्रुवारी - दिमित्री इवानोविच मेंडेलिएफ :** रशियन रसायनशास्त्रज्ञ
**जन्म : ७ फेब्रुवारी १८३४, मृत्यू : २ फेब्रुवारी १९०७.**
मूलद्रव्यांचा आवर्तन सिद्धांत १८९१ साली मांडला.

**१० फेब्रुवारी - विल्हेल्म ऱ्योन्टगेन : जर्मन भौतिकशास्त्रज्ञ**
**जन्म : २७ मार्च १८४५, मृत्यू : १० फेब्रुवारी १९२३.**
मूलद्रव्यांचा आवर्तन सिद्धांत १८९१ साली मांडला. क्ष - किरणांचा शोध (५ नोव्हेंबर १८९१)

**६ फेब्रुवारी - मेघनाद साहा : भारतीय भौतिकशास्त्रज्ञ**
**जन्म : ६ ऑक्टोबर १८९३, मृत्यू : १६ फेब्रुवारी १९५६.**
आण्विक भौतिकीमधील अध्यापन व संशोधन भारतात सुरु केले

**२७ फेब्रुवारी - इवान पेत्रोवीच पावलोव : रशियन भौतिकशास्त्रज्ञ**
**जन्म : १४ सप्टेंबर १८४९, मृत्यू : २७ फेब्रुवारी १९३६.**
प्रतिक्षेपी व प्रक्षेपी प्रतिक्षिप्त क्रिया यांचा शोध. मेंदूचे कामकाज व मानसिक प्रक्रियांविषयी भौतिकवादी शास्त्रीय द्रुष्टीकोणास पुष्टी व चालना दिली.



### तारांगण

**फेब्रुवारी ९:** २०२२ मधल्या पहाटेच्या आकाशात शुक्राची सर्वात जास्त भासमान चमक

**फेब्रुवारी १६:** बुधाचे परम पश्चिमेकडील इनांतर - बुध सूर्यापासून २६.३ डिग्री अंतरावर. बुधाचे निरीक्षण करण्यासाठी ही उत्तम वेळआहे कारण तो पहाटे पूर्व क्षितीजाच्या जास्तीत जास्त वर दिसून येईल. तुम्ही सूर्योदयापूर्वी काही काळ पूर्व क्षितिजावर तो बघू शकता.

**२८ फेब्रुवारी - राष्ट्रीय विज्ञान दिन**
प्राचीन व अर्वाचीन भारतीय शास्त्रज्ञांची वैज्ञानिक कामगिरी व मर्यादा, तसेच भारतीय समाजाची प्रगती होण्यासाठी त्यांचे योगदान याची माहिती गोळा करण्यासाठी गटांमध्ये निबंधाची, वक्तृत्वाची स्पर्धा ठेवावी. यावर आधारित पोस्टर प्रदर्शन तयार करून ठिकठिकाणी दाखवावे.


Kwality Paints

*With Best Compliments From*
**Kwality Paints & Coatings Pvt. Ltd.**

Manufacturers of Paints & Enamels

W-83, 'S' Block, M.I.D.C. Bhosari,
Pune - 411026. (INDIA)
Tel. :020-27120694. Fax : 020-30781905.
Mobile : 94220 02558.
E-mail : kwalitypaints@yahoo.com
Website : www.kwalitypaints.co.in

benchmark CERTIFICATION ISO9001:2000

# लोकविज्ञान दिनदर्शिका २०२२

लोकविज्ञान प्रकाशन



## पवन सुखदेव



भारतीय पर्यावरण अर्थतज्ज्ञ.
जन्म - ३० मार्च, १९६०

लाभ-हानी, आनंद-दुःख याबाबत चुकीच्या बाजारपेठीय संकल्पनांचा प्रसार करणारे शिक्षण हा निसर्गाचे मोल समजून घेण्यातील मोठा अडथळा आहे. निसर्गापासून फारकत घेण्याची अहमहमिका लागलेल्या काळात परंपरा आणि नवता यांचा संगम घडवत पर्यावरण अर्थतज्ज्ञ पवन सुखदेव (Pavan Sukhdev) निसर्गाची महत्ता सांगत आहेत. तसेच 'नीती-मूल्य' कालबाह्य झाली आहेत असा गैरसमज पसरलेल्या काळात ह्या संकल्पनेचे अनेक 'अर्थ'

## मार्च - २०२२

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | ५ |
| ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ |
| २७ | २८ | २९ | ३० | ३१ | | |
| | | | | | | |



### या महिन्यातील विज्ञान दिन

**१६ मार्च- याकोव इसिदरोविच पेरेलमान : रशियन लोकवैज्ञानिक**
**जन्म : १८८२, मृत्यू : १६ मार्च १९४२.**
पेरेलमान हे सोविएत युनियनमधील अत्यंत लोकप्रिय असे विज्ञान लेखक आहेत, 'मनोरंजक पदार्थ विज्ञान', 'मनोरंजक बीजगणित', 'आंतरग्रहीय प्रवास'आदी पुस्तकातून त्यांनी सोप्या भाषेतून काटेकोरपणे लाखो वाचकांपर्यंत विज्ञान पोचवलें.

**२० मार्च- आयझॅक न्यूटन : इंग्लिश गणितज्ञ व भौतिकशास्त्रज्ञ**
**जन्म : २५ डिसेंबर १६४२, मृत्यू : २० मार्च १७२७.**
गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत सुसंगत रूपात मांडला व ग्रहगतीसंबंधीच्या प्रश्नांना सुसंगत वैज्ञानिक उत्तरे दिली, पांढरा प्रकाश सात रंगांच्या किरणांचे मिश्रण तयार होऊन बनला आहे याची सप्रयोग सिद्धता.



### तारांगण

**मार्च २० :** March Equinox -वसंत संपात बिंदू - सूर्य बरोबर विषववृत्तावर असेल. त्यामुळे जगभर दिवस व रात्र सम समान वेळेची असतील. ह्या दिवशी उत्तर गोलार्धात वसंत ऋतूचा पहिला दिवस आणि दक्षिण गोलार्धात शरद ऋतूचा पहिला दिवस असतो.
**मार्च २७ :** चंद्र, मंगळ व शुक्र आकाशात जवळजवळ दिसतील.

AVIRAJ Transport Service all over maharashtra
Avinash Kulkarni
Designationxxxxxx
9689925501
1249/50, Deccan Gymkhana, Greetwell Bldg., 2nd Floor, Pune-411044.
kulkarniaviraj@yahoo.in

# लोकविज्ञान दिनदर्शिका २०२२

लोकविज्ञान प्रकाशन



## चार्ल्स डेव्हिड कीलिंग

### अमेरिकन रसायनशास्त्र वैज्ञानिक

### जन्म - २० एप्रिल, १९२८; मृत्यू २२ - जून, २००५




जंगलातील हवेत कर्बवायूमध्ये तसेच त्यामधील कार्बनच्या समस्थानिकांच्या प्रमाणात दैनंदिन चक्रीय बदल होतात आणि त्याचा संबंध झाडांच्या प्रकाशसंश्लेषण, श्वसनाशी असतो हा चार्ल्स डेव्हिड कीलिंग (Charles David Keeling) ह्यांचा हा 'वातावरणीय पार्श्वभूमी'चा शोध महत्त्वाचा! त्यामुळेच वातावरणातील $CO_2$च्या आणि मिथेन, नायट्रस ऑक्साईड, क्लोरोफ्लोरोकार्बन्स सारख्या हरितगृह वायूंच्या अभ्यासाला प्रेरणा मिळाली. म्हणजे कीलिंग ह्यांनी 'जगाचा श्वास मोजला'.

## एप्रिल - २०२२

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | १ | २ |
| ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ |
| २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० |
| | | | | | | |





### या महिन्यातील विज्ञान दिन

**४ एप्रिल - मिखाईल लमनोसफ : रशियन रसायनशास्त्रज्ञ**

**जन्म : ८ नोव्हेंबर १७११, मृत्यू : ४ एप्रिल १८६५**

प्रकाश लहरींचा व ज्वलन तत्वाविषयीचा सिद्धांत मांडला. मॉस्को विद्यापीठाच्या स्थापनेत पुढाकार.

**१८ एप्रिल - अल्बर्ट आईनस्टाईन : अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ**

**जन्म : १४ मार्च १८७९, मृत्यू : १८ एप्रिल १९५५**

ब्राउनियन गतीसंबंधीचा सिद्धांत, सापेक्षता सिद्धांत, वस्तुमान आणि उर्जा यांच्यातील समानत्वाचा सिद्धांत ($E=mc2$) यांचा जनक.

**१९ एप्रिल - चार्लस डार्विन : ब्रिटीश निसर्गतज्ञ**

**जन्म : १२ फेब्रुवारी १८०९, मृत्यू : १९ एप्रिल १८८२**

पृथ्वीवरील वनस्पती व प्राणीजीवन ईश्वराने एकाच वेळी निर्माण केले, या बायबलप्रणित व त्याकाळी सर्वमान्य असलेल्या विचारास आव्हान दिले. जीवसृष्टीच्या क्रमशः झालेल्या विकासातून पृथ्वीवरील असंख्य जीवजाती व त्यातील विविधता निर्माण झाली हे पुराव्याचा अभेद्य डोंगर रचून सिद्ध केले.






**एप्रिल २२-२३ :** लिरिड्स (Lyrids)उल्का वर्षाव - हा एक सरासरी वर्षाव आहे. ज्यात साधारणपणे ताशी २० उल्का तयार होतात. सन १८६१ मध्ये शोधल्या गेलेल्या धूमकेतू C/1861 G1 Thatcher च्या मागे राहिलेल्या धूलिकणांपासून हा उल्का वर्षाव तयार होतो. ह्या उल्का कधी कधी बरेच सेकंद दिसून येणाऱ्या धूलिकणांच्या प्रकाशमान रेषा निर्माण करतात. (Dust Trails). अष्टमीच्या चंद्रप्रकाशात कमी तेजस्वी उल्का नीट दिसणार नाहीत. उल्का स्वरमंडळ (Lyra) तारकासमूहातून आल्यासारख्या वाटतील.

**एप्रिल २९ :** बुधाचे परम पूर्वेकडील इनांतर - बुध सूर्यापासून २०.६ डिग्री अंतरावर. बुधाचे निरीक्षण करण्यासाठी ही वेळ योग्य आहे कारण तो संध्याकाळी सूर्यास्तानंतर पश्चिम क्षितिजाच्या वरती दिसून येईल

**मिखाईल लमनोसफ दिवस असा साजरा करा.**

आपल्या भागातील शेतीची अवजारे, सिंचन व्यवस्था, पिके, पिकांच्या जाती, खतांचा वापर, आहार यामध्ये गेल्या २५-३० वर्षात काय बदल झाले याची माहिती खेड्यात गटागटाने गोळा करावी. त्या बदलतील परस्पर संबंध जाणकारांच्या मदतीने समजावून घ्यावेत व त्यावर कृषीतज्ञ, समाजशास्त्रज्ञ यांच्याबरोबर चर्चा / व्याख्यान ठेवावे (याही क्षेत्रात त्यांचे संशोधन कार्य होते).





COVISHIELD™

ChAdOx1 nCoV-19 Corona Virus Vaccine (Recombinant)

More than 1 billion doses released in 2021

**WORLD'S LARGEST VACCINE MANUFACTURER** by number of doses produced.

It is estimated that **about 65% of the children** in the world receive at least **one vaccine manufactured by Serum Institute of India.**

Serum Institute currently **manufactures 1.5 billion vaccine doses per year,** thus saving the lives of **more than 30 million children** in more than **170 COUNTRIES** across the globe.

Bacterial Vaccines

**Tetanus Vaccine,** Tetanus Vaccine (Adsorbed) I.P.
**Dual Antigen,** Diphtheria and Tetanus Vaccine (Adsorbed) I.P.
**Triple Antigen,** Diphtheria, Tetanus and Pertussis Vaccine (Adsorbed) I.P.
**Sii Td-Vac,** Diphtheria and Tetanus Vaccine (Adsorbed) for Adults and Adolescents I.P.
**Sii HibPro,** Haemophilus Influenzae Type b Conjugate Vaccine I.P.
**Tubervac,** Bacillus Calmette-Guerin (BCG) Vaccine I.P.
**Pneumosil,** Pneumococcal Polysacharide Conjugate Vaccine (Adsorbed)

Viral Vaccines

**M-Vac,** Measles Vaccine (Live) I.P. (Freeze-dried)
**R-Vac,** Rubella Vaccine (Live) I.P. (Freeze-dried)
**MR-Vac,** Measles & Rubella vaccine
**Tresivac / Tresivac NF,** Measles, Mumps and Rubella Vaccine (Live) I.P. (Freeze-dried)
**Rotasiil,** Live Attenuated (oral) Rotavirus Vaccine Freeze–dried and Liquid
**Rabivax-S,** Rabies Vaccine, Human I.P. (Freeze-dried)
**Poliovac,** Poliomyelitis Vaccine (Inactivated) I.P.

Recombinant, Combination Vaccines and Other products

**GeneVac-B,** Hepatitis B Vaccine (rDNA) I.P.
**Sii Q-Vac,** Diphtheria, Tetanus, Pertussis (Whole Cell) and Hepatitis B (rDNA) Vaccine (Adsorbed) I.P.
**Quadrovax PFS , Quadrovax SD (liquid),** Diphtheria, Tetanus, Pertussis (Whole Cell) and Haemophilus Influenzae Type b Conjugate Vaccine (Adsorbed) I.P.
**Pentavac PFS, Pentavac SD (liquid),** Diphtheria, Tetanus, Pertussis (Whole Cell), Hepatitis B (rDNA) and Haemophilus Influenzae Type b Conjugate Vaccine (Adsorbed) I.P.
**Rabishield,** Rabies Human Monoclonal antibody
**Repoitin,** Erythropoietin Injection I.P.

World's largest producer of DPT and MMR Groups of Vaccines

Regd. office & Laboratories: 212/2, Hadapsar, Pune-411028 and S. No. 105-110, Manjari BK., Pune-412307, India.
Phone: +91-20-26993900 Fax: +91-20-26993924/21 www.seruminstitute.com. E-mail: serumexports@seruminstitute.com. For Domestic enquiries: serumpmt@yahoo.co.in

# लोकविज्ञान दिनदर्शिका २०२२

लोकविज्ञान प्रकाशन



## मिलोतीन मिलेन्कोविच


इंजिनियर आणि खगोलीयभौतिकी तज्ज्ञ.

जन्म – २८ मे, १८७९; मृत्यू – १२ डिसेंबर, १९५८

हिमयुगं अवतरणं आणि ती संपणं यांमागील कारणं आणि त्यांच्या परिणामांची व्याप्ती याबाबत विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत निश्चित सिद्धांत तयार झाले नव्हते. सध्याचा सर्बिया (तेव्हाचा क्रोशिया) येथील मिलोतीन मिलेन्कोविच (Milutin Milankovitch) या इंजिनियर आणि खगोलीय भौतिकी तज्ज्ञानं १९२४-१९३० दरम्यान वरील विषयासंबंधी मूलगामी विचार केला आणि गुंतागुंतीची गणितं करून पृथ्वीच्या संदर्भात मानवी आयुष्याच्या कित्येक पट प्रदीर्घ परिक्रमा-कालावधी असणाऱ्या तीन चक्राचं अस्तित्व शोधले आणि हिमयुगं अवतरणं-संपणं याची पथदर्शी गणिती सैद्धांतिक मांडणी संगणकयुग अवतरण्यापूर्वीच केली.

## मे - २०२२

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ |
| २९ | ३० | ३१ | | | | |



### या महिन्यातील विज्ञान दिन

**२ मे - लिओनार्दो दा व्हिंची : इटालियन चित्रकार व शास्त्रज्ञ**

**जन्म : १५ एप्रिल १४५२, मृत्यू : २ मे १५१९.** पृथ्वी हजारो शतके चाललेल्या प्रक्रियेतून उत्पन्न झाली हे भूस्तरशास्त्राच्या अभ्यासातून मांडले, अनेक यांत्रिक शोध व यंत्रांच्या तत्वांची मांडणी.

**८ मे - ऑन्त्वान लव्हाझिए : फ्रेंच रसायनशास्त्रज्ञ**

**जन्म : २६ ऑगस्ट १७४३, मृत्यू : ८ मे १७९४.**

ज्वलन प्रक्रियेतून प्राणवायूच्या कार्याचा शोध, रासायनिक मूलद्रव्यांचे शास्त्रीय वर्गीकरण.

**२४ मे - निकोलस कोपरनिकस : पोलिश खगोलशास्त्रज्ञ**

**जन्म : १९ फेब्रुवारी १४७३, मृत्यू : २४ मे १५४३.**

कोपरनिकसने सुर्यकेंद्री सिद्धांत मांडून युरोपमध्ये सर्वमान्य असलेल्या टोलेमीच्या पृथ्वीकेंद्री सिद्धांताला धक्का दिला. यामुळे खगोलशास्त्रात क्रांतिकारक बदल झाले, शिवाय पोप व चर्च यांच्या अबाधित अधिसत्तेच्या संकल्पनेला हादरा बसला.



### तारांगण

**मे ६, ७ :** Eta Aquarids उल्का वर्षाव - हा एक सरासरीपेक्षा मोठा वर्षाव आहे. उत्तर गोलार्धात ताशी ३०तर दक्षिण गोलार्धात ताशी ६० पर्यन्त उल्का दिसून येतात. हॅलेच्या धूमकेतूच्या धूलिकणांमुळे ह्या उल्का तयार होतात. दरवर्षी एप्रिल १९ ते मे २८ या काळात हा वर्षाव होतो. या वर्षी, ६-७ मे च्या रात्री जास्त जोर दिसून येईल. चंद्र लवकर मावळल्यावर मध्यरात्रीच्या सुमारास अंधा-या जागेतून पाहील्यास छान वर्षाव दिसू शकतो. हा उल्का वर्षाव कुंभ तारकासंघातून आल्यासारखा वाटेल.

**मे १६:** पौर्णिमा व चंद्रग्रहण. हे खग्रास ग्रहण आहे. पृथ्वीच्या छायेतुन चंद्र जाईल. हे ग्रहण भारतातून दिसणार नाही, उत्तर अमेरिका,पश्चिम युरोप,व पश्चिम आफ्रिकेतून दिसेल.


Abhiom ENGINEERS

Interior Decorator Contractor

3 C / A2 / 8 ,
New Ajantha Avenue,
Kothrud, Pune 411029.
Mobile : 9823011116.

# लोकविज्ञान दिनदर्शिका २०२२

लोकविज्ञान प्रकाशन



## सुझान सिमार्ड

### कॅनेडियन जंगल परिसंस्था तज्ज्ञ

जन्म:१९६०



विविध प्रजातीच्या झाडेझुडुपे, शेवाळी, बुरशी, पशूपक्षी, कीटक यांच्यातील 'स्पर्धे'वर नव्हे तर परस्पर 'सहकार्या'वर, देवाणघेवाणीवर उभी असलेली जैवविविधतेने नटलेली सशक्त परिसंस्था म्हणजे जंगल! झाडांच्या जमिनीखाली पसरलेल्या मुळांच्या जैविक साखळ्यांच्या संरचनेतून जंगलातील झाडांचा एकमेकांशी 'संवाद' चालतो आणि जंगलाचे स्वतंत्र अस्तित्व असल्याप्रमाणे वर्तन घडते. सुझान सिमार्ड (Suzanne Simard) ह्यांनी मोनोकल्चरने 'जंगल' निर्मिती होत नाही हे दाखवून दिले आहे.

## जून - २०२२

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ | २ | ३ | ४ |
| ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ |
| २६ | २७ | २८ | २९ | ३० | | |
| | | | | | | |



### या महिन्यातील विज्ञान दिन

**३ जून- विल्यम हार्वे : इंग्लिश शरीरक्रियातज्ज्ञ**
**जन्म :** १ एप्रिल १५७८, मृत्यू : ३ जून १६५७. हृदया मार्फत रक्ताभिसरण चक्राकार पद्धतीने चालते हे सिद्ध केले.

**५ जून - जागतिक पर्यावरण दिन**
पर्यावरण जपणारी विकासनीती या विषयावर व्याख्यान किंवा चर्चा आयोजित करावी.

**१६ जून - प्रफुल्ल चंद्र राय : भारतीय रसायनशास्त्रज्ञ**
**जन्म :** २ ऑगस्ट १८६१, मृत्यू : १६ जून १९४४. नायट्रेट्सवर संशोधन, स्वदेशी रासायनिक उद्योगाची स्थापना.

**२९ जून - दामोदर धर्मानंद कोसंबी : भारतीय इतिहासशास्त्रज्ञ व गणितज्ञ जन्म :** ३१ जुलै १९०७, मृत्यू : २९ जून १९६६. प्राथमिक इतिहासाचा वस्तुनिष्ठ पद्धतीने अभ्यास करण्यास नवी दिशा, गणितात पाथजिओमेट्री ही नवी विवेचन पद्धती. जागतिक शांतता चळवळीत क्रियाशील.






**जून १४ :** पौर्णिमा व सुपरमून या वर्षीच्या तीन सुपरमून्स पैकी हा पहिला. चंद्र पृथ्वीच्या जरा जास्त जवळ येईल व तो नेहमीपेक्षा थोडासा मोठा व तेजस्वी दिसेल.

**जून १६:** बुधाचे परम पश्चिमेकडील इनांतर - बुध सूर्यापासून २३.२ डिग्री अंतरावर.पावससचे ढग नसल्यास,बुधाचे निरीक्षण करण्यासाठी ही उत्तमवेळआहे कारण तो पहाटे पूर्व क्षितीजाच्या जास्तीत जास्त वर दिसून येईल. तुम्ही सूर्योदयापूर्वी काही काळ पूर्व क्षितिजावर तो बघू शकता.

**जून २१ :** सूर्य कर्क वृत्तावर - यास विष्टंभ बिंदू (Summer Solstice) सुद्धा म्हणतात. या दिवशी पृथ्वीचा उत्तर ध्रुव सूर्याकडे सर्वात जास्त झुकलेला असतो. त्यामुळे सूर्य जास्तीत जास्त उत्तरेस दिसतो.





Suprathane
CAST POLYURETHANE PRODUCTS
www.suprathane.com

PVT. LTD.
Speciality Urethanes
Head Office : N-19, Additional MIDC, Satara - 415 004. (India).
Tel : +91 - 2162 - 240721 / 722 / 723 Fax : +91 - 2162 - 240724
Regd. & Branch Office : 324, Shaniwar Peth, Pune - 411 030. (India).
Tel : +91 - 20 - 24453482 Fax : +91 - 20 - 24480152
E-mail : info@suprathane.com

# लोकविज्ञान दिनदर्शिका २०२२

लोकविज्ञान प्रकाशन



## थॉमस लव्हजॉय

अमेरिकन परिसंस्था व संरक्षण संवर्धन जीवशास्त्र वैज्ञानिक

जन्म: २२ ऑगस्ट १९४१




"जैवविविधतेचे गॉडफादर" म्हणून ओळखले जाणारे थॉमस ई. लव्हजॉय (Thomas Lovejoy) परिसंस्था आणि संरक्षण व संवर्धन जीवशास्त्रातील अग्रणी वैज्ञानिक आहेत. संरक्षण-संवर्धन जीवशास्त्राचा (Conservation Biology) पाया लव्हजॉय ह्यांनी घातला असे म्हटले जाते आणि `जैविक विविधता' ही संज्ञा त्यांनी जगाला दिली. विकसनशील देशांनी पर्यावरण संरक्षण-संवर्धनासाठी गुंतवणूक केल्याबद्दल त्यांच्या परकीय कर्जातील भाग माफ करण्याची `पर्यावरण संरक्षणाच्या बदल्यात कर्जमाफी'ची संकल्पना त्यांनी मांडली.

## जुलै - २०२२

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | १ | २ |
| ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ |
| २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० |
| ३१ | | | | | | |





### या महिन्यातील विज्ञान दिन

**४ जुलै- मारी क्युरी : पोलिश – फ्रेंच रसायनशास्त्रज्ञ**

**जन्म : ७ नोव्हेंबर १८६७, मृत्यू : ४ जुलै १९३४.**

१९०३ मध्ये अतिकिरणोत्सारी रेडियमचा शोध मारी व पेरी क्युरी यांनी लावला. नोबेल पारितोषिक – १९०३, १९११.

**१३ जुलै - फ्रीडरिश केकुले – जर्मन रसायनशास्त्रज्ञ**

**जन्म : ७ सप्टेंबर १७६६, मृत्यू : २७ जुलै १८४४.**

संयुगाच्या रासायनिक रचना – सूत्रांचा शोध लावला व कृत्रिम रासायनिक औषधनिर्मितीचा पाया घातला.

**२७ जुलै - जॉन डाल्टन : इंग्लिश रसायनशास्त्रज्ञ**

**जन्म : ६ सप्टेंबर १७६६, मृत्यू : २७ जुलै १८४४.**

रसायनशास्त्रीय प्रयोगाआधारे आणवीय सिद्धांत मांडला.

**२९ जुलै - रोनाल्ड फिशर : इंग्लिश संख्याशास्त्रज्ञ**

**जन्म : १७ फेब्रुवारी १८९०, मृत्यू : २९ जुलै १९६२.**

जीव सांख्यिकीशास्त्रात संशोधन. नवनवीन शास्त्र शाखात सांख्यिकी पद्धतीचा वापर.



### तारांगण

**जुलै १३** : पौर्णिमा व सुपरमून या वर्षीच्या तीन सुपरमून्स पैकी हा दुसरा. चंद्र पृथ्वीच्या जरा जास्त जवळ येईल व तो नेहमीपेक्षा थोडासा मोठा व तेजस्वी दिसेल.

**जुलै २८, २९ :** Delta Aquarids उल्का वर्षाव - हा एक सरासरी उल्का वर्षाव आहे आणि साधारणतः ताशी २० उल्का निर्माण होतात. धूमकेतू Marsden आणि Kracht यांच्या मागे राहिलेल्या कचऱ्यातून ह्या उल्का बनतात. पावसाळी ढगाळ आकाश नसल्यास, अमावास्येच्या अंधारात छान उल्का दिसू शकतील. हा उल्का वर्षाव कुंभ तारकासंघातून आल्यासारखा वाटेल.

नंद कॉम्पोझिटस्

इंजिनीअरिंग, प्लास्टिक्स , इंजेक्शन मोल्डिंग

डब्ल्यू ११४, 'एस' ब्लॉक,एम.आय.डी.सी., भोसरी, पुणे ४११ ०२६.

दूरध्वनी : २७१२ ०३८२, ६६११३२७७.

फॅक्स : ९१-२०-२७१२८५९६. E-mail : info@nandcomposites.in

# लोकविज्ञान दिनदर्शिका २०२२

लोकविज्ञान प्रकाशन



## सुनीता नारायण

भारतीय पर्यावरण तज्ञ-संशोधक

जन्म - २३ ऑगस्ट, १९६१

सुनीता नारायण (Sunita Narain) भारतातील एक आघाडीच्या व तळमळीच्या पर्यावरण धोरण संशोधक, झुंजार पत्रकार, जनवादी पर्यावरणीय प्रवक्त्या आहेत. सेंटर फॉर सायन्स अँड एनव्हायरमेंट (सीएसई) ह्या अनिल अगरवाल ह्यांनी स्थापन केलेल्या संस्थेचे त्यांच्या पश्चात त्या नेतृत्व करतात. पर्यावरणीय -हासाचा गरिबांवर होणा-या भयानक परिणामांमागची अनैतिकता स्पष्ट केली तर जग ते समजून घेईल. आपण ही लढाई हरलेलो नाही, असे त्या मांडतात.



## ऑगस्ट - २०२२

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० |
| २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ |
| २८ | २९ | ३० | ३१ | | | |
| | | | | | | |



### या महिन्यातील विज्ञान दिन

**१४ ऑगस्ट - जॉ फ्रेडरिक जोलिओ : फ्रेंच अणु शास्त्रज्ञ**

**जन्म : १९ मार्च १९००, मृत्यू : १४ ऑगस्ट १९५८.**

नवी किरणोत्सारी द्रव्ये बनवली. शांतता चळवळीच्या स्थापनेत पुढाकार, १९३५ मध्ये पत्नी आयरेन क्युरीसह नोबेल पारितोषिक.

**२५ ऑगस्ट - मायकेल फॅराडे : इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ**

**जन्म : २२ सप्टेंबर १७९१, मृत्यू : २५ ऑगस्ट १८६७.**

विजेच्या प्रवाहाच्या साहाय्याने रासायनिक पृथ:करण करण्यासाबंधीचे नियम मांडले. विद्युत प्रवाहाच्या चुंबकीय परिणामांचा शोध व प्रेरणा-क्षेत्राच्या संकल्पनेची मांडणी. पहिले विद्युतजनित्र बनवले.

**६ ऑगस्ट - हिरोशिमा दिन**

**६ ऑगस्ट १९४५** मानवाच्या व विज्ञानाच्या इतिहासातील काळाकुट्ट दिवस.



### तारांगण

**ऑगस्ट १२ :** पौर्णिमा व सुपरमून - या वर्षीच्या तीन सुपरमून्स पैकी हा शेवटचा. चंद्र पृथ्वीच्या जरा जास्त जवळ येईल व तो नेहमीपेक्षा थोडासा मोठा व तेजस्वी दिसेल.

**ऑगस्ट १२, १३ :** Perseids उल्का वर्षाव -निरीक्षण करायलाहा एक अति उत्तम उल्का वर्षाव आहे. तशी ६० उल्का निर्माण होतात. १८६२ मध्ये शोधल्या गेलेल्या Swift - Tuttle या धूमकेतूमुळे हा उल्का वर्षाव होतो. हा वर्षाव हा मोठ्या प्रमाणावर तेजस्वी उल्का बनवण्यात प्रसिद्ध आहे. पौर्णिमेच्या मोठ्या चंद्रप्रकाशामुळे बऱ्याचशा पुसट उल्का दिसू शकणार नाहीत.अर्थात पावसाळी ढगांनी अडसर न आणल्यास, उल्का वर्षाव सुंदर दिसू शकेल.

**ऑगस्ट १४ :** शनीची प्रतियुती. शनी पृथ्वीच्या सर्वात जवळ आलेला असेल व त्याचा दर्शनी भाग पूर्णपणे प्रकाशमान झाला असेल. तेजस्वी शनी पूर्ण रात्रभर छान दिसेल.

**ऑगस्ट २७ :** बुधाचे परम पूर्वेकडील इनांतर - बुध सूर्यापासून २७.३ डिग्री अंतरावर. संध्याकाळी, सूर्यास्तानंतर पश्चिम क्षितीजाच्या वरती दिसून येईल.


AURA

AURA LASERFAB PVT. LTD.

A Cutting Edge Technological Solution !

Gat No.1021, Village Shirwal, Tal: Khandala, Dist. Satara - 412 801
Near Lakwim Ltd.,On Pune - Banglore Highway.
Ph: 98817 27472, 98220 51621
E_mail : sales@auralaser.net, Web: www.auralaser.net

# लोकविज्ञान दिनदर्शिका २०२२

लोकविज्ञान प्रकाशन




## शुकुरो मानाबे

### जपानी वंशाचे अमेरिकन हवामान-विज्ञान तज्ज्ञ

### जन्म - २१ सप्टेंबर, १९३१

मानवी कृतींमुळे भावी पिढ्या, मानवी संस्कृती, समाज यांच्या मुळावर घाला घालणाऱ्या हवामान- बदलाच्या गंभीर धोक्यांची जाणीव शुकुरो मानाबेंनी(Shukurō (Syukuro) Manabe) वैज्ञानिक संशोधनातून करून दिली. या संकटाची कारणे व ते टाळण्यासाठी काय करायला हवे याबाबतचे मार्गदर्शन त्यांनी केले. पृथ्वीच्या हवामानाचे भौतिक संगणकीय मॉडेल करण्याचे काम सर्वप्रथम त्यांनी केले. त्यासाठी त्यांना २०२१ चे भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक देण्यात आले आहे.



## सप्टेंबर - २०२२

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १ | २ | ३ |
| ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ |
| २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | |
| | | | | | | |



## या महिन्यातील विज्ञान दिन

**२८ सप्टेंबर - लुई पास्तर : फ्रेंच सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ**

**जन्म : २७ डिसेंबर १८२२, मृत्यू : २८ सप्टेंबर १८९५.**

रोग सूक्ष्म जिवाणूंमुळे होतात हे सिद्ध करून त्यावर रोगप्रतिबंधक लस निर्माण करण्याचा शोध. त्यामुळे रेबीज, घटसर्प, धनुर्वात आदी रोगांवर उपाययोजना शक्य झाली

**२८ सप्टेंबर - एडविन हबल : अमेरिकन खगोलशास्त्रज्ञ**

**जन्म : २० नोव्हेंबर १८८९, मृत्यू : २८ सप्टेंबर १९५३.** ज्ञात आकाशगंगेच्या पलीकडील आकाशगंगांचा शोध लावला. विश्वाच्या प्रसरणाचा एक निश्चित वेग असतो व विश्व हे सतत बदलणारे आहे हे सिद्ध केले.

**१ सप्टेंबर - जागतिक शांतता दिन**

आज जगात अणुबॉम्बचे इतके प्रचंड साठे आहेत, की सर्व पृथ्वीवासीयांचा ३० वेळा विनाश करण्याएवढी महासंहारक शक्ती त्यामध्ये आहे, या विरोधात जगभर शांतता चळवळी कार्यरत आहेत. या दिवशी भारत - पाक अण्वस्त्र स्पर्धा कशी टाळता येईल यावर चर्चा / व्याख्यान आयोजित करावे.



## तारांगण

**सप्टेंबर १६ :** नेपच्यून प्रतियुती -हा मोठा निळा ग्रह पृथ्वीला सर्वात जवळ आलेला असेल. वर्षाच्या इतर कोणत्याही वेळेपेक्षा ह्या वेळी तो जास्त प्रकाशमान आणि रात्रभर आकाशात दिसेल. ह्याचे पृथ्वीपासूनचे अंतर खूपच जास्त असल्याने शक्तीशाली दुर्बिणीतूनच हा दिसू शकेल.


**सप्टेंबर २३ :** शरद संपात बिंदू (September Equinox) सूर्य सरळ विषुववृत्तावर प्रकाशतो आणि जगभर दिवस आणि रात्र सारख्या वेळेची असतात. उत्तर गोलार्धात ही शरद ऋतूची आणि दक्षिण गोलार्धात वसंत ऋतूची सुरुवात असते.

**सप्टेंबर २६ :** गुरुची प्रतियुती. आपल्या सूर्यमालेतील सर्वात मोठा ग्रह हा पृथ्वीच्या सर्वात जवळ आलेला असेल व त्याचा दर्शनी भाग सूर्यप्रकाशात पूर्णपणे प्रकाशमान झाला असेल. वर्षात सर्वात तेजस्वी असे गुरूचे हे दर्शन असेल. गुरु व त्याच्या चंद्रांचे निरीक्षण करायला ही उत्तम वेळ आहे. दुर्बीणीमधून पाहिल्यास गुरूचे सर्वात मोठे चार चंद्र दिसू शकतील.

LEADERS IN STEPPING MOTORS
SRIJAN
CONTROL DRIVES PVT. LTD.
Manufacturers of : SYNCHRONOUS AND STEPPER MOTORS AND CONTROLLERS
Electronic Industrial Estate,
Shed 25,
Satara Road,
Pune - 411 009.
Phone : 020 24225650.
E-mail : srijanmotors@gmail.com

# लोकविज्ञान दिनदर्शिका २०२२

लोकविज्ञान प्रकाशन



## क्लाऊस फेर्डिनांड हासलमान

जर्मन पर्यावरण-वैज्ञानिक
जन्म – २५ ऑक्टोबर, १९३१; हाम्बुर्ग, जर्मनी



पृथ्वीच्या हवामानाचे भौतिक मॉडेल तयार करणे, त्यातील परिवर्तनशीलतेचे प्रमाण निश्चित करणे, जागतिक तापमान वाढीचा विश्वासार्ह अंदाज करणे आणि पर्यावरण क्षेत्रातील या संबंधीच्या गुंतागुंतीच्या बहुविद्याशाखीय प्रणालींचे आकलन वाढवणे यासाठी क्लाऊस हासलमान (Klaus Ferdinand Hasselmann) यांनी मोलाचे योगदान दिले. त्यासाठी त्यांना शुकुरो मनाबे आणि जॉर्जो परिसी यांच्या समवेत २०२१ सालचा भौतिक विज्ञानाचा नोबेल पुरस्कार मिळाला.

## ऑक्टोबर - २०२२

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | १ |
| २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ |
| ३० | ३१ | | | | | |



### या महिन्यातील विज्ञान दिन

**४ ऑक्टोबर - मॅक्स प्लांक : जर्मन भौतिकशास्त्रज्ञ**
**जन्म : २३ एप्रिल १८५८, मृत्यू : ४ ऑक्टोबर १९४७.**
पुंज (quantum) सिद्धांताचा जनक

**१९ ऑक्टोबर - अर्नेस्ट रुदरफोर्ड : ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ**
**जन्म : ३० ऑगस्ट १८७१ मृत्यू : १९ ऑक्टोबर १९३७.**
किरणोत्सर्गावर काम, इंग्लंडमधील अणुसंशोधनाचे जनक

**२७ ऑक्टोबर - लिझे माईट्नर : ऑस्ट्रियन भौतिकशास्त्रज्ञ**
**जन्म : ७ नोव्हेंबर १८७८ मृत्यू : २७ ऑक्टोबर १९६८.**
युरेनियम अणुच्या विखंडनाबाबत सैद्धांतिक मांडणी (१९३९)



### तारांगण

**ऑक्टोबर ७:** Draconids उल्का वर्षाव. हा एक छोटा उल्का वर्षाव आहे ज्यात तशी अंदाजे १० उल्का तयार होतात. १९०० साली शोधला गेलेल्या धूमकेतू २१PGiacobini - Zinner च्या धूलिकणांपासून हा वर्षाव तयार होतो. याचा जोर संध्याकाळी लवकर जास्त असतो. बहुसंख्य उल्का कालेय (Draco) तारका संघातून येतील.

**ऑक्टोबर ८ :** बुधाचे परम पश्चिमेकडील इनांतर - बुध सूर्यापासून १८ डिग्री अंतरावर.सूर्योदयापूर्वी काही काळ बुध पूर्व क्षितिजावर बघू शकता.

**ऑक्टोबर २१, २२ :** Orionids उल्का वर्षाव. हा एक सरासरी वर्षाव आहे. तो अंदाजे तशी २० उल्का निर्माण करतो. हॅलेच्या धूमकेतूच्या मागे राहिलेल्या धूलिकणांपासून हा वर्षाव बनला आहे. चंद्रप्रकाशाची जास्त लुडबूड नसल्याने चांगले उल्का दर्शन व्हायची शक्यता. जास्त उल्का मृग नक्षत्रातून आल्यासारख्या वाटतील.

**ऑक्टोबर २५ :** खग्रास सूर्य ग्रहण –पश्चिम भारतातून दिसेल.


With Best Compliments From
PRECISION
Precision Transmatic Devices Pvt. Ltd.
B-48, M.I.D.C., Satara - 415 004. (India)
Tel. : (02162) 244454, 246245.
Fax : (02162) 244204.
E-mail : sales@ptdin.com
TÜV ISO 9001


# लोकविज्ञान दिनदर्शिका २०२२

लोकविज्ञान प्रकाशन



## वॉलेस स्मिथ ब्रोकर

अमेरिकन भूगर्भ-रसायन वैज्ञानिक,
हवामान वैज्ञानिक
२९ नोव्हेंबर १९३१- १८ फेब्रुवारी २०१९




सर्व महासागर समुद्रीप्रवाहांच्या मार्फत जोडलेले असून त्यांतील पाणी सतत वाहते असते. ही समुद्रीप्रवाहांची संरचना `ग्लोबल कन्व्हेयर' सिद्धांताद्वारे वॉलेस स्मिथ ब्रोकर (Wallace Smith Broecker) ह्यांनी मांडली. हरितगृहवायूंमुळे वाढणाऱ्या तापमानाचा समुद्रीप्रवाहांवर परिणाम होऊ शकतो. तापमान वाढीमुळे समुद्राच्या पातळीत वाढ, किनारपट्टीवर पूर आणि इतरत्र अवर्षणासारख्या समस्या निर्माण होऊ शकतात हे त्यांनी मांडले आणि `ग्लोबल वॉर्मिंग' ही संज्ञा रूढ केली.



## नोव्हेंबर - २०२२

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | ५ |
| ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ |
| २७ | २८ | २९ | ३० | | | |
| | | | | | | |



### या महिन्यातील विज्ञान दिन

**५ नोव्हेंबर - जेम्स मॅक्सवेल : स्कॉटिश भौतिकशास्त्रज्ञ**
**जन्म : १३ नोव्हेंबर १८३१, मृत्यू : ५ नोव्हेंबर १८७९.**
फॅरेडेच्या विद्युत व चुंबकीय क्षेत्र संकल्पनेला गणिती समीकरणाचे रूप दिले.

**१५ नोव्हेंबर - जोहानेस केपलर : जर्मन खगोलशास्त्रज्ञ**
**जन्म : २७ डिसेंबर १५७१, मृत्यू : १५ नोव्हेंबर १६३०.**
ग्रहांच्या भ्रमण कक्षा लंबवर्तुळाकार असल्याचे दाखवून त्यासंबंधी नियम मांडले.

**१९ नोव्हेंबर - नील्स बोहर : डॅनिश भौतिकशास्त्रज्ञ**
**जन्म : ७ ऑक्टोबर १८८५, मृत्यू : १९ नोव्हेंबर १९६२.**
हायड्रोजन अणूचे प्रतिरूप. १९२२ मध्ये नोबेल पारितोषिक.

**२१ नोव्हेंबर - चंद्रशेखर वेंकटरमण (सी. व्ही. रामन) भारतीय भौतिकशास्त्रज्ञ**
**जन्म : ७ नोव्हेंबर १८८८, मृत्यू : २१ नोव्हेंबर १९७०.**
आशियातील पहिले नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ. प्रकाशलहरीसंबंधी 'रामन इफेक्ट' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रक्रियेचा शोध.

**२३ नोव्हेंबर - जगदीशचंद्र बोस : भारतीय भौतिक व वनस्पती शास्त्रज्ञ**
**जन्म : ३० नोव्हेंबर १८५८, मृत्यू : २३ नोव्हेंबर १९३७.**
बिनतारी संदेशवाहक साधनांचा शोध (१८९५). हवा, प्रकाश, अन्न आदी घटकांचा वनस्पतीवरील परिणाम, वनस्पतीची वाढ व प्रतिसाद आदींची मापने करण्यासाठी अनेक संवेदनशील उपकरणे बनवून बहुमोल प्रयोग केले.



### तारांगण

**नोव्हेंबर ४,५ :** Taurids उल्का वर्षाव. हा बराच काळ चालणारा पण कमी उल्कांचा वर्षाव आहे. ताशी ५-१० उल्का निर्माण होतात. ह्याचे दोन प्रकार आहेत. Asteroid २००४ TG१० आणि धूमकेतू २PEncke ह्यांच्या मागे राहिलेल्या धूलिकणांमुळे हा तयार होतो. तेजस्वी चंद्रप्रकाशामुळे, कमी उल्का दिसण्याची शक्यता. उल्का वृषभ तारकासंघातून आल्यासारख्या भासतील.

**नोव्हेंबर ८ :** पौर्णिमा व चंद्रग्रहण. भारताच्या पूर्वेकडील भागात खग्रास व पश्चिमेकडे खंडग्रास ग्रहण दिसेल. चंद्र उगवतानाच ग्रहणात असेल.

**नोव्हेंबर ९ :** युरेनसची प्रतियुती. शक्तिशाली दुर्बिणीतूनही तो छोटासा निळा हिरवा ठिपका दिसतो.

**नोव्हेंबर १७, १८ :** Leonids उल्का वर्षाव - हा सरासरी वर्षाव आहे व जास्तीत जास्त ताशी १५ उल्का निर्माण होतात. रात्रभर मस्त उल्कावर्षाव पाहायला मिळेण्याची शक्यता. उल्का सिंह तारकासंघातून आल्यासारख्या वाटतील.


**SHARVI iNFRACON**
Contracting | Interior | Infra
1249/50, Deccan Gymkhana,
Greetwell Bldg., 2nd Floor, Pune - 411004,
+91 9422509679 +91 9420709089
sharviinfracon@gmail.com

# लोकविज्ञान दिनदर्शिका २०२२

लोकविज्ञान प्रकाशन



## जेन लुबचेन्को

अमेरिकन पर्यावरण-वैज्ञानिक


जन्म - ४ डिसेंबर, १९४७

डॉ. जेन लुबचेन्को (Jane Lubchenco) या पर्यावरणीय आव्हानांवरील दीर्घकालीन उपायांच्या संशोधनाबरोबरच अध्यापन आणि प्रशासन क्षेत्रात सखोल अनुभव असलेल्या पर्यावरण-वैज्ञानिक आहेत. वैज्ञानिकांनी समाजाबरोबर सातत्याने संवाद राखत आपली सामाजिक जबाबदारी पार पाडली पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. वैज्ञानिक माहिती दडपणे, सोयीस्कररित्या बदलणे असे होऊ नये; तिचा दुरुपयोग होऊ नये, संशोधकांना मीडियाशी मुक्तपणे बोलता यावे यासाठीच्या 'वैज्ञानिक सचोटी' या धोरणाच्या त्या प्रवर्तक आहेत.



## डिसेंबर - २०२२

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १ | २ | ३ |
| ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ |
| २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ |
| | | | | | | |





### या महिन्यातील विज्ञान दिन

**१ डिसेंबर - जॉन बर्टन हाल्डेन : ब्रिटिश - भारतीय लोकवैज्ञानिक**

**जन्म : ऑक्सफर्ड, ५ नोव्हेंबर १८९२, मृत्यू : भुवनेश्वर, १ डिसेम्बर १९६४.** अनुवंशिकता शास्त्राला सांख्यिकीची जोड. वैज्ञानिक विषयांवर विस्तृत लिखाण.

**३ डिसेंबर - भोपाळ दिन**

२ व ३ डिसेम्बर १९८४ दरम्यानच्या मध्यरात्री, युनियन कार्बाईड या अमेरिकन कंपनीच्या भोपाळ येथील कीटकनाशकांच्या कारखान्यातून प्रचंड प्रमाणात विषारी वायू गळती होऊन हजारो भोपळवासी मरण पावले. कारखान्यातील सुरक्षा यंत्रणा अपुरी, निकामी असल्याने वायुगळती झाली. भीषण दुर्घटनेपासून धडा घेऊन असे अपघात टाळण्यासाठी जागरूक राहिले पाहिजे. त्यासाठी लोकशिक्षणाचे कार्यक्रम आयोजित करावेत.

**३० डिसेंबर-रॉबर्ट बॉईल : ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ जन्म : २५ जानेवारी १६२७, मृत्यू : ३० डिसेंबर १६९१.** किमयाशास्त्राचे रसायनशास्त्रात रूपांतर



### तारांगण

**डिसेंबर ८ :** मंगळाची प्रतियुती. लाल मंगळ ग्रह पृथ्वीच्या जवळ आला असेल. आकाशात तेजस्वी व रात्रभर दिसेल.

**डिसेंबर १३, १४ :** Geminids उल्का वर्षाव - याला उल्का वर्षावाचा राजा म्हणतात. १२० उल्का, त्याही रंगीबेरंगी, दर ताशी निर्माण होतात. लघु ग्रह ३२०० Phaethon च्या मागे राहिलेल्या कचऱ्यातून हा वर्षाव बनतो. मिथुन तर्कसंघातून उल्का आल्यासारखे वाटेल.

**डिसेंबर २१ :** बुधाचे पूर्वेकडील परम इनांतर - बुध ग्रह सूर्यापासून २०.१ डिग्री अंतरावर पोचतो. सूर्यास्तानंतर लगेचच पश्चिम क्षितिजावर बुध बघा.

**डिसेंबर २१ :** अवष्टंभ बिंदू (winter solstice) - सूर्य सर्वात दक्षिणेकडे, वर्षातील सर्वात लहान दिवस, उत्तर गोलार्धात हिवाळ्याचातर दक्षिण गोलार्धात उन्हाळ्याचा पहिला दिवस असतो.

**डिसेंबर २१, २२ :** Ursids उल्का वर्षाव - हा छोटा उल्का वर्षाव आहे. ताशी ५-१० उल्का बनतात. १७९० साली शोधल्या गेलेल्या टटल धूमकेतूच्या मागे राहिलेल्या धूलिकणांपासून हा उल्का वर्षाव निर्माण होतो. जास्त उल्का सप्तर्षी मधून आल्यासारख्या वाटतील.

With Best Compliments From
INNOVA ENTERPRISES
STOCKISTS OF
HIGH POWER SEMI CONDUCTORS :
THYRISTOR DIODE IGBT, TRANSITOR MODULES (SIEMENS / SEMIKRON).
FUSES :
IN BRITISH, DIN AND AMERICAN STANDARD (JEAN MULLER & BUSSMANN).
Sr. No. 81, Plot No. 3/2, Shivane Road, SHIVANE, Tal. Haveli, NDA Khadakeasla Rd, PUNE : 411 023.
● Tel.: 020-25290077 / 78, 25292188, 25291177.
● Fax : 020- 25290078.
● email : innova_enter@vsnl.net
sales_innova@vsnl.net